महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.उशिप्र-११२५/प्र.क्र.१६/एसईबीसी-ओबीसी/जा.वै.प्र/सुचना/ **९९३** दिनांक : **१३ एप्रिल २०२५**

# सुचना

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उच्च शिक्षण विभागाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता एसईबीसी (SEBC) आणि ओबीसी (OBC) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी सादर करावायाच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत.**

संदर्भ - सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०२/०५/२०२५

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उच्च शिक्षण विभागाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता एसईबीसी (SEBC) आणि ओबीसी (OBC) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी संदर्भिय शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. **त्यानुसार सदरील उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ०१/०८/२०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.**

परंतु बऱ्याच उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्याप पर्यंत प्रवेशित महाविद्यालयात जमा व अपलोड केले नाही अशा सर्व उमेदवारांना **दिनांक १४/०५/२०२५ पासून** जात वैधता प्रमाणपत्र महाविद्यालयात जमा करण्याबाबत पुढील प्रमाणे कळविण्यात येत आहे :-

१) ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध आहे परंतू कॅप पोर्टलमध्ये अपलोड केले नाही. अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ प्रवेशित महाविद्यालयाकडे जमा करावे आणि संबंधित महाविद्यालयाने सदर प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या लॉगईनमधून कॅप पोर्टमध्ये अपलोड (Upload) करावे.

२) तसेच, ज्या उमेदवारांना अद्याप पर्यंत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही अशा उमेदवारांनी संबंधित जिल्हा पडताळणी समितीकडून आपले जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्यात यावे आणि विहित कालावधीत प्रवेशित महाविद्यालयाकडे जमा करावे आणि महाविद्यालयाने सदर प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या लॉगईनमधून कॅप पोर्टमध्ये अपलोड (Upload) करावे.

३) तसेच उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र महाविद्यालयामध्ये जमा केले असेल तर सदर महाविद्यालयांनी आणि उमेदवारांनी कॅप पोर्टलमध्ये सदर प्रमाणपत्र अपलोड केले आहे की नाही याबाबत खातरजमा करावी.

वरीलप्रमाणे अधिकच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या उमेदवारांचे प्रवेशाबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची सर्व संबधित उमेदवार व शैक्षणिक संस्था यांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**